**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1204 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/11/2023 03:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/11/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/11/2023
**Time From (वेळेपासून):** 15:32 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/11/2023 **Time (वेळ):** 03:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 013
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/11/2023 03:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शाहु मार्केट यार्ड कोल्हापूर ,येथील कषी विभागाची खते, तपासणीची प्रयोग शाळा परीसर, कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उमेश बाळासो सोळसे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | केर्ली, ताकरवीर, जि कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | केर्ली, ताकरवीर, जि कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल जगन्नाथ जाधव | | | 1. इंद्रजीत कलनी, गंगाधाम , अपार्टमेंन्ट, जाधववाडी,, कोल्हापुर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराच्या 18भारतीय चलनी नोटा | 9,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

9,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद                                                  दिनांक - 29/11/2023

मी उमेश बाळासो सोळसे, वय - 36 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. केर्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर मो नं 9689646665 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 28/11/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना समक्ष भेटून लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, मी जैविक शेती तसेच सेंद्रीय शेती करण्याबाबत शेतकरी लोकांना मार्गदर्शन करत असतो. आता मी शेतीला लागणारे खत, बी, बियाणे आणि कीटकनाशके यांची विक्री करण्याचे स्वतःचे दुकान चालु करणार असल्याने त्याकरीता आवश्यक असलेला परवाना (लायसन) मिळण्याकरीता मी जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथे ऑनलाईन अर्ज केला होता. सदरचा अर्ज मंजुर करून पुढील कार्यवाही करून वरीष्ठांच्याकडे पाठविणेकरीता जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथील श्री सुनिल जाधव कृषी अधिकारी यांनी माझेकडे 10,000/- रू. दयावे लागतील असे म्हणुन पैशाची मागणी केली. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दिनांक 28/11/2023 रोजी सुनिल जाधव साहेबांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी पोलीस निरीक्षक श्रीमती आसमा मुल्ला मॅडम यांना बोलावुन घेवुन माझे तक्रारीवर कारवाई करणेबाबत समक्ष कळविले. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी लागलीच दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. त्यानंतर आमची,दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यावेळी मी त्यांना माझी वरील तक्रार सांगितली.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई धैर्यशिल हॉल कोल्हापूरचे परिसरातुन करण्याचे आहे सांगीतले. त्यानंतर मी, मुल्ला मॅडम, नाळे साहेब पंच व स्टाप असे सर्वजण धैर्यशिल हॉल परिसरात गेलो. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचाना देवुन कृषी अधिकारी सुनिल जाधव यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आवश्यक सुचना देवुन मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे दिला. मी व पंच नं.01 कलकुटकी असे दुपारी 15.32 वाजता माझेकडील मोटर सायकल वरून जाधव साहेब यांचे कसबा बावडा येथील ऑफीसमध्ये गेलो त्यावेळी ते तेथे नव्हते म्हणुन मी त्यांचे मोबाईल नंबर 7758036368 वरती माझे वरील मोबाईलवरून फोन लावला असता त्यांनी मला ते मार्केट यार्ड कोल्हापूर येथील खत तपासणी लॅब जवळ असुन तेथे या असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे मार्केट यार्ड येथे जावुन जाधव यांना परत फोन केला त्यावेळी ते मला भेटले. त्यावेळी आमच्यात माझे खताचा विक्री करीता आवश्यक असणारा परवाना(लायसन) बाबत बोलणे झाले त्यावेळी मी त्यांना तुम्ही मला 10,000/- रूपये सांगितले होते. त्यावेळी त्यांनी मला मी केलेल्या अर्जाची अॅप्लीकेशन आयडी (फॉर्म)त्यांचे व्हाटसअँप क्रमांकावर पाठवा म्हणाले. त्यावेळी मी त्याना तुम्ही पैसे मागीतले होत ते त्यासाठी म्हणुन थांबलो होतो... जराशी अडचण होती... असे म्हणालो. त्यावेळी जाधव यांनी ठिक आहे ना मग... आता झालय काय ते... असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना दहा हजार बोलाय... जरा कमी करा... असे म्हणालो. त्यावेळी जाधव यांनी दे पटकण चल तिथं... इन्स्पेकेशन चालु आहे असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैसे आता घेवुन आलो नाही मी पैसे मिळाल्यानंतर तुम्हाला फोन करतो असे म्हणालो. त्यावेळी जाधव यांनी बर... झाल्यानंतर कॉल कर असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैसे थोडे कमी करा असे म्हणालो त्यावेळी जाधव यांनी एक हजार कमी दे जा... असे म्हणाले त्यावेळी मी बर बर... नऊ हजार पर्यंत देतो असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच नं.01 असे नाळे साहेब व मुल्ला मॅडम थांबलेल्या ठिकाणी परत आलो. मला व पंच 01 यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन नाळे साहेबांनी व मुल्ला मॅडम यांनी खात्री केली. त्यावेळी सुनिल जाधव हे मला आवश्यक आसणारा खत, बी, बियाणे आणि कीटकनाशके यांची विक्री परवाना (लायसन) अर्ज मंजुर करून वरीष्ठांकडे पाठविणेकरीता माझेकडे 9,000/- रूपये लाच मागणी करीत असल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर सुनिल जाधव कृषी अधिकारी यांच्यावर सापळा कारवाई विश्रामगृहामधील एका खोलीतुन चालु

केली त्यावेळी मी हजर केलेली लाच रक्कम 9,000/- रूपयांच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावली तसेच आवश्यक ती सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा माझ्या शर्टाच्या डावे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकात पुर्वीचे तसेच नवीन सामील झालेले अमंलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने नाळे साहेब व मुल्ला मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर नाळे साहेब यांचे सुचनेवरून मी सुनिल जाधव यांना फोन करून त्यांचे मोबाईल क्रमांकावरती मी केलेल्या अर्जाचा अॅप्लीकेशनचा आयडी पाठवला आहे असे सांगितले. त्यावेळी जाधव बर बर असे म्हणाले त्यावेळी मी नऊ हजारची जुळणा झाली आहे ते घेवुन यायला लागलोय तुमच्याकडे असे म्हणालो त्यावेळी त्यांनी हं... म्हणुन ठीक आहे ये... असे म्हणाले सदरचा कॉल रेकॉर्ड केला. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळ्यात अडकविले त्यानंतर मी व पंच 01 कलकुटकी असे माझेकडील मोटर सायकलवरून 17.55 वाजता जाधव साहेबांना भेटायला शाहु मार्केट यार्ड कोल्हापूर येथील खताचे लॅबचे जवळ चाललो त्यावेळी आमचे पाठोपाठ बोलेरो मधुन नाळे साहेब, मुल्ला मॅडम,पंच नं.2 दिक्षित व सापळा पथकातील स्टाफ त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या मोटर सायकलवरून आले व तेथील परिसरात सापळा लावुन थांबले. मी खताचे लॅबजवळ जावुन जाधव यांना फोन लावला त्यावेळी त्यांनी मला शाहु मार्केट यार्ड मधील संघाचे गोडावन जवळ येण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच 1 संघाचे गोडावुन जवळ गेलो आमचेसोबत सापळा पथक ही येवुन तेथे परिसरात सापळा लावुन थांबले. मी जाधव साहेबांना तेथे भेटलो त्यावेळी आमचेत माझे शिक्षणाचे तसेच डिग्रीचे सर्टिफिकेटचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी जाधव यांनी मला आणलंस का... असे म्हणुन हाताचा इशारा करून पैश्याची मागणी केली. त्यावेळी मी त्याना मोजुन घ्या की... नऊ आहेत... असे म्हणुन लाच रक्कम 9,000/- रूपये त्यांचेकडे दिली. त्यावेळी जाधव साहेब यांनी असुन दया की... त्या थोड काय... असे म्हणाले. त्यानंतर आमच्यात सर्टिफिकेटचे अनुषंगाने बोलणे चालु असताना मी माझा डावा हात तोंडावरून फिरवुन पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच नाळे साहेब, मुल्ला मॅडम तसेच सापळा पथकातील अंमलदार पंच नं.02 दिक्षित असे सदर ठिकाणी येवुन स्विकारलेल्या लाच रक्कमेसह सुनिल जाधव यास रंगेहाथ पकडले. त्यानंतर सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यावेळी सुनिल जाधव यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव सुनिल जगन्नाथ जाधव, वय - 50 वर्षे, पद - जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, वर्ग-2, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर,सद्या रा. इंद्रजीत कॉलनी, गंगाधाम अपार्टमेंन्ट, जाधववाडी,कोल्हापूर, मुळ रा. प्लॅट नंबर 34,अंजली कॉलनी, शाहुपूरी सातारा, जि.सातारा असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी मी शेतीला लागणारे खत, बी, बियाणे आणि कीटकनाशके यांची विक्री करण्याचे स्वतःचे दुकान चालु करणार असल्याने त्याकरीता आवश्यक असलेला परवाना (लायसन) मिळण्याकरीता मी जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथे ऑनलाईन अर्ज केला होता. सदरचा अर्ज मंजुर करून पुढील कार्यवाही करून वरीष्ठांच्याकडे पाठविणेकरीता सुनिल जगन्नाथ जाधव, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांनी प्रथम माझेकडे 10,000 रू. ची लाच मागणी करून तडजोडीअंती 9,000/- रूपयेची अप्रामाणिकपणे तसेच स्वःताच्या फायदयाकरीता लाच मागणी करून सदरची लाच रक्कम 9,000/- रूपये स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने त्याला रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी सुनिल जगन्नाथ जाधव, वय - 50 वर्षे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, वर्ग-2, जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर,सद्या रा. इंद्रजीत कॉलनी, गंगाधाम अपार्टमेंन्ट, जाधववाडी,कोल्हापूर, मुळ रा. प्लॅट नं.34,अंजली कॉलनी, शाहुपूरी सातारा यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)
Shitalkumar Maruti Kolhal
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPSMKM8417
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
ठाणे अंमलदार
शाहुपुरी पोलीस ठाणे

**Name** (नाव): ajay janardan sindka
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH46135